सं.फौ.ख.क्र.३९६/२०२१
सरकार वि. सुभाष
नि.क्र.१३ च्या खाली

साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–वैभव देविदास भिसे,
वय ३८ वर्ष, व्यवसाय– नोकरी (लिपिक नगरपरिषद)
राह.जागीठानापेठ उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. दि.०२/०२/२०२१ रोजी मी नगरपरिषद उमरेड येथे कार्यरत होतो. त्यावेळी आमच्या कोव्हीडच्या नियंत्रणाबाबत ड्युट्या लागलेल्या होत्या त्यावेळी जिल्हाधिकारी यांचा दौरा होता. सदर दौ–याच्या वेळी जिल्हाधिकारी यांना आरोपीचे दुकाण चालु दिसले. त्यावेळी जिल्हाधिकारी यांच्याकडून निरोप आला की, नगरपरिषदेमध्ये स्थानिक टिम येथे यावे. त्यानंतर तहसिलदार व त्यांची टिम व मी असे घटनास्थळावर हजर झालो. त्यानंतर तेथे पोलिसांनी मोका पंचनामा केला. त्यावेळी आम्हाला आरोपीचे हरिओम दुकाण हे उघडे होते, त्यावेळी रात्री ८.०० ते ९.०० वाजेची वेळ होती. त्यावेळी सदर दुकाणामध्ये ग्राहक होते व ते ग्राहक जिल्हाधिकारी यांना दिसुन आल्यामुळे त्यांनी कारवाई करण्यास निर्देशित केले. त्यानंतर कारवाईची प्रक्रिया पुर्ण झाली. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते.

२. पोलिसांनी माझ्यासमक्ष तेथे घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. आता मला सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानि क्र.१७** देण्यात आला. सदरचा घटनास्थळ पंचनामा हा कोरोना कालावधीमध्ये वेळेला बंधन दिले होते, त्या वेळेव्यतिरिक्त सदर दुकाण चालु होते त्याबाबतचा होता.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.जी.आर.हुंगे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, जिल्हाधिकारी यांचा दौरा असल्यानंतर त्यापुर्वी दौ–याची माहिती ही कार्यालयाला दिली जाते. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. मी पोलिसांना बयाण देतेवेळेस 'त्यावेळी जिल्हाधिकारी यांचा दौरा होता, सदर दौ–याच्या वेळी जिल्हाधिकारी यांना आरोपीचे दुकाण चालु दिसले, त्यावेळी जिल्हाधिकारी यांच्याकडून

निरोप आला की, नगरपरिषदेमध्ये स्थानिक टिम ने यावे,त्यावेळी सदर दुकाणामध्ये ग्राहक होते व ते ग्राहक जिल्हाधिकारी यांना दिसुन आल्यामुळे त्यांनी कारवाई करण्यास निर्देशित केले' असे सांगितले होते. आता मला माझे बयाण दाखविण्यात आले त्यामध्ये सदर मजकुर जसाच्या तसा नमुद नाही तो का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. पंचनामा करण्यापुर्वी पोलिसांनी मला समन्स दिले नाही.

**४.** पंचनामा हा रात्री ८.०० ते ९.०० वाजताच्या दरम्यान सुरू झाला होता. सदर पंचनामा हा दोन–तीन तासानंतर संपला. त्यावेळी दुसरा पंच साक्षीदार हे दिलीप चव्हाण व अनिल येवले असे होते. पोलिसांनी पंचनामा हा टाईप केला होता. साक्षीदार पुन्हा सांगतो की, त्यावेळी टाईप करणारेही होते आणि हाताने लिहीणारेही होते. मला आता तेवढे आठवत नाही की, सदर पंचनामा हा अर्धा टाईप केला होता व अर्धा हाताने लिहीला होता किंवा कसे. घटनास्थळाच्या चतुर्सिमा मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर गेलो नाही व माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर गेलो त्यावेळी आरोपीचे दुकाण उघडे होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.०९.०४.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड